# स्पर्धेविषयी...

महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा कायापालट करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) जागतिकस्तरावरील आराखडा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेची सुरुवात १ डिसेंबरपासून होत आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या मध्यभागी असणाऱ्या या उद्यानाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी तांत्रिकदृष्ट्या प्रगत, सौंदर्यदृष्टीने सर्वोत्तम आणि पर्यावरणाला सुसंगत असे बदल सुचविणे अपेक्षित आहेत.

या स्पर्धेचे दोन मुख्य उद्देश आहेत. यामध्ये महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा सर्वसमावेशक कायापालट करणे, म्हणजे पर्यावरणाशी सुसंगत असा जंगलाचा विकास करणे, उद्यानातील निसर्ग अभ्यास आणि पर्यटनाला अधिक चालना देणे हा यामागील पहिला उद्देश आहे. त्याचप्रमाणे फक्त पादचारी आणि सायकलस्वारांना वापरता येईल असा बांद्रा-कुर्ला संकुल आणि महाराष्ट्र निसर्ग उद्यान यांना जोडणारा पूल मिठी नदीवर उभारणे हा दुसरा मुख्य उद्देश आहे.

या स्पर्धेत विजयी होणाऱ्या स्पर्धकाला दोन कोटी मुंबईकरांना आवडेल अशी संकल्पना मांडायची आहे. यातून आपले शहर सर्वसमावेशक, निसर्गावर प्रेम करणारे, जगण्यासाठी सुंदर व्हावे अशी अपेक्षा आहे. आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत अभियान आणि स्मार्ट सिटीच्या मांडणीला अनुसरूनच ही स्पर्धा घेण्यात येत आहे. शहरी जीवन अधिक समृद्धपणे जगता यावे यासाठी उपलब्ध संसाधनांचा कसा सुयोग्य वापर करता येईल यासाठी ही स्पर्धा मदत करेल. लोकांच्या सहभागातून शहराचे भविष्य घडविण्यासाठी प्रोत्साहन देणे, हा यामागचा हेतू आहे.

महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या कायापालटाचे तसेच त्याला जोडणाऱ्या पादचारी व सायकलस्वारांसाठीच्या पुलाचे आरेखन प्रस्ताव (आराखडे) या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याद्वारे पुढे यावेत, अशी अपेक्षा आहे. असे प्रस्ताव पाठविणाऱ्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान असणे तसेच संबंधित क्षेत्रातील आरेखनाचा पुरेसा अनुभव असणे अपेक्षित आहे.

स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यांत, पहिल्या टप्प्यांतून निवडण्यांत आलेल्या पाच प्रवेशिकांना त्यांनी तयार केलेले मास्टर प्लॅन (आरेखन नमुने) अधिक विस्तृतपणे विकसित करण्याविषयी सांगण्यात येईल. या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) बरोबर काम करण्याची संधी मिळेल. अर्थात उद्यानाचा कायापालट करणारा विजेत्या टीमचा प्रस्ताव अधिक तपशीलवार विकसित करताना, शासनाच्या संबंधित विभागांची परवानगी, पर्यावरणाशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्यात येईल. तसेच, इमारत व बांधकामविषयक नियमांचे पालनही आराखड्यास अंतिम स्वरूप देताना काटेकोरपणे केले जाईल. आवश्यक त्या परवानग्या मिळवून कंत्राटदारामार्फत तो आराखडा प्रत्यक्ष अंमलात आणण्याच्या टप्प्यापर्यंत आणून ठेवण्याचे काम करण्याची संधी विजेत्या टीमला मिळेल.

## महाराष्ट्र निसर्ग उद्यान

महाराष्ट्र निसर्ग उद्यान हे ३७ एकरांच्या विस्तीर्ण परिसरावर पसरलेले उद्यान आहे. मिठी नदीच्या दक्षिण काठावर पूर्वी जिथे कचरा टाकण्यात येई, अशा जागेवर हे उद्यान सध्या उभे आहे.या उद्यानाचा कायापालट करण्यामागे अत्यंत महत्त्वाकांक्षी उद्दीष्ट आहे. मुंबईकरांच्या मनांत निसर्गाविषयी आपुलकीची भावना निर्माण करणे तसेच, शाश्वत जीवनशैली अनुसरणे हीच यामागील संकल्पना आहे. या कायापालटाद्वारे उद्यानात असलेल्या वनसंपदेचे जतन आणि संवर्धन होणे अपेक्षित आहे. तसेच, येथे या उद्यानाला पूरक अशा पायाभूत सुविधा उभ्या राहणे, जसे – नॉलेज सेंटर, नदीकाठाचे सुशोभिकरण, अपेक्षित आहे. मुंबईत पर्यावरणविषयक शिक्षण आणि जनजागृती व्हावी, असा सर्वसमावेशक आराखडा या स्पर्धेतून पुढे यावा अशी अपेक्षा आहे.

## मिठी नदीवरील पूल

यामध्ये पर्यावरणाशी निगडीत आणि अभियांत्रिकी आव्हाने असून त्यावर संबंधित भागधारकांनी मात करण्याची गरज आहे. बांद्रा- कुर्ला संकुलाजवळ

मिठी नदीच्या उत्तरेकडील काठावर उभारण्यात येणाऱ्या पूलाचा आराखडा हा एकविसाव्या शतकातील आधुनिक स्थापत्यकलेशी एकरुप असणे गरजेचे आहे. त्याचवेळी नदीच्या दक्षिण काठाजवळ असणाऱ्या महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या जंगलसदृश्य पर्यावरणाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. तसेच तेथून जवळपास असणाऱ्या दळणवळणाशी निगडीत केंद्राशीही तो जोडलेला असावयास हवा. या महत्वाच्या पादचारी पूलाचा रोज सुमारे ५० हजार नागरिक वापर करतील,अशी अपेक्षा आहे आणि मुंबई तसेच  मुंबई महानगर परिसरात अशाप्रकारचे लोकाभिमुख पादचारी मार्ग उभारण्याची लाट निर्माण व्हावी हादेखील त्यामागचा हेतू आहे. अशाप्रकारचा मार्ग हे एक आश्वासक उदाहरण असून आगामी दशकांत बीकेसीमध्ये होणाऱ्या विस्तारासाठी पूरक ठरेल. हा पूल महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या जडणघडणीत महत्वाचा घटक ठरू शकेल.

या उपक्रमासाठी नॉलेज पार्टनर असणाऱ्या ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ओआरएफ)मुंबई यांच्या सहकार्याने एमएमआरडीएने याबाबत एका स्पर्धेचे आयोजन केले आहे. हा उपक्रम तसेच या स्पर्धेबाबतची अधिकाधिक आणि अचूक माहिती लोकांना उपलब्ध व्हावी यासाठी ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ओआरएफ)मुंबईने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.